International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# जागतिकीकरणाच्या संदर्भात 'अभिधानंतर' या नव्वदोत्तर अनियतकालिकाचे वाङ्मयीन योगदान

**प्रवीण सदानंद गायकर**

*सहायक प्राध्यापक, मराठी विभाग,*

*महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल, जि. रायगड*

*Corresponding Author –* प्रवीण सदानंद गायकर

**DOI - 10.5281/zenodo.18654188**

***गोषवारा :***

*नव्वदोत्तर कालखंडात म्हणजे जागतिकीकरणाच्या सुरुवातीस मराठीमध्ये अनियतकालिकांचा दुसरा टप्पा सुरू झाला. साठोत्तरी अनियतकालिकांची निर्मिती प्रयोजने काही अंशी पूर्णत्वास गेल्यामुळे व या कालखंडातील बहुसंख्य अनियतकालिके निस्तेज ठरल्यामुळे ही चळवळ मंदावली. पुढे ११९९० नंतर अनियतकालिकांचे पुनरुज्जीवन करणारी दुसरी पिढी जन्माला आली. १९८७ साली शेगावसारख्या छोट्याशा गावातून 'शब्दवेध' हे दा. गो. काळे यांनी संपादित केलेले अनियतकालिक सुरू झाले. २००८ पर्यंत त्याचे जवळपास ३३ अंक प्रकाशित झालेले दिसतात. 'अभिधा' हे हेमंत दिवटे आणि संदेश ढगे यांनी सुरू केलेले अनियतकालिकही १९९२ साली प्रकाशित झाले. १९९८ सालापर्यंत त्याचेही एकूण १५ अंक प्रकाशित झालेले दिसतात. त्यानंतर ते आपोआप बंद पडले. त्याच्या पुढच्याच वर्षी 'अभिधा'कर्त्यांनी 'अभिधानंतर' हे नाव धारण करून या अनियतकालिकाचे पुनरुज्जीवन केले. फक्त 'अभिधानंतर'च्या वेळी मात्र हेमंत दिवटे यांनी एकट्याने या अनियतकालिकाची धुरा सांभाळली. त्यामुळे या अनियतकालिकाचा स्वतंत्र विचार करणे संयुक्तिक ठरेल. याशिवाय आणखी एक अतिशय महत्त्वाचे कारण या अनियतकालिकाच्या अभ्यासामागे आहे ते म्हणजे - आज जागतिकीकरणावर, त्याच्या परिणामांवर व त्यातून निर्माण झालेल्या परिस्थितीवर सगळीकडेच कमी अधिक प्रमाणात चर्चा होत असतात. मात्र मराठी वाङ्मयीन नियत व अनियतकालिकांमध्ये ही चर्चा ठळकपणे 'अभिधानंतर' या अनियतकालिकाच्या कर्त्यांनीच पहिल्यांदा घडवून आणली, असे म्हणता येईल. 'अभिधानंतर'च्या संपादकांनी आपली भूमिका मांडताना पहिल्याच अंकात व्यक्त केलेले मनोगत या दृष्टीने फार महत्त्वाचे ठरते. ते म्हणतात - "आपल्याकडे सर्व कलांवर इम्पोर्टेड गोष्टींचा प्रचंड परिणाम आहे. कविता, कथा, कादंबरी, समीक्षा, चित्रकला वगैरे सर्वच सर्जनशीलतेवर पाश्चात्यांचा प्रचंड प्रभाव आहे. रोमँटिसीझम त्यांचा, देशीवाद त्यांचा, आधुनिकता त्यांची व उत्तरआधुनिकताही त्यांचीच. आपल्याकडे परवापरवा अमेरिकेत आढळलेला कम्प्युटर व्हायरस येतो. आठवड्यापूर्वी लॉन्च झालेली फॅशनही लगेच येते. मात्र ग्लोबलायझेशनमुळे आपली होत असलेली घुसमट आपल्या कवितेत, कथेत कशी काय येत नाही? ही काय गोची आहे? मराठी लेखक व कलावंत या प्रोसेसच्या बाहेर कसा राहू शकतो?"[१] 'अभिधानंतर'च्या कर्त्यांनी या प्रश्नाचा पुढे सातत्याने पाठपुरावा केलेला दिसून येतो. याशिवाय आपल्याला असेही म्हणता येईल की, याच अंगाने मराठी साहित्याची विशेषत: नव्वदोत्तर कवितेची चर्चा झालेली दिसते. प्रस्तुत शोधनिबंधातून 'जागतिकीकरणाच्या संदर्भात 'अभिधानंतर' या अनियतकालिकाचे वाङ्मयीन योगदान' समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.*

***बीजशब्द : अनियतकालिके, 'अभिधानंतर', जागतिकीकरण, नव्वदोत्तर साहित्य, कविता, वाङ्मयीन चळवळ.***

**प्रस्तावना :**

मराठी अनियतकालिकांच्या चळवळीचा दुसरा टप्पा १९९० साली सुरू झाला, असे म्हणण्याचे मुख्य कारण म्हणजे 'अभिधा' आणि 'अभिधानंतर' ही या कालखंडातील दोन मुख्य अनियतकालिके अनुक्रमे १९९२ व १९९९ साली सुरू झाली. याच कालखंडातील महत्त्वाचे म्हणावे असे 'शब्दवेध' हे अनियतकालिक १९८७ साली सुरू झाले व नव्वदीच्या सुरुवातीच्या दोन वर्षातच बंदही पडले. त्यामुळे रूढ अर्थाने नव्वदोत्तर अनियतकालिकांमध्ये पहिले स्थान 'अभिधा'कडेच जाते. १९९८ ला 'अभिधा' थांबले आणि त्याच्या पुढच्याच वर्षी 'अभिधा'कर्त्यांनी 'अभिधानंतर' हे नाव धारण करून 'अभिधे'ला पुन्हा पुनर्जीवित केले. 'अभिधानंतर'चा पहिला अंक जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर १९९९ मध्ये प्रकाशित झाला. तर दिवाळी २००८ चा अंक हा शेवटचा अंक ठरला. उण्यापुऱ्या दहा वर्षे चाललेल्या या अनियतकालिकाचे एकूण २५ अंकच प्रकाशित झाले. प्रस्तुत शोधनिबंधात फक्त 'अभिधानंतर' या एकमेव अनियतकालिकाचा विचार करण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे 'शब्दवेध' व 'अभिधा' ही अनियतकालिके सामूहिक संपादकीय निर्मितीतून जन्माला आली. परंतु 'अभिधानंतर' मात्र हेमंत दिवटे यांनी एकट्याने एकहाती चालवलेले, स्वतंत्र विचारांचे व सर्वार्थाने जागतिकीकरणाच्या संकल्पनेला वाहिलेले अनियतकालिक होते. आपली भूमिका स्पष्ट करताना 'अभिधानंतर'चे कर्ते पहिल्या अंकाच्या संपादकीय लेखातून म्हणतात, "चांगली वेगळी कविता, चांगलं वेगळं साहित्य, साहित्याचे नवे प्रवाह तसेच साहित्याबरोबरच इतर कलांचे नवे प्रवाह रसिकांपर्यंत पोहोचविण्याचे व एक प्रकारे सुजाण मराठी रसिक वाचकांना नव्या प्रवाहाशी जोडणे, असा 'अभिधानंतर'चा उद्देश राहील."[२]

**'अभिधानंतर'चे वाङ्मयीन योगदान :**

'अभिधानंतर' हे अनियतकालिक कविता या वाङ्मय प्रकाराला केंद्रस्थानी मानणारे असले तरी अधूनमधून इतर वाङ्मयीन प्रकारांनाही अधोरेखित करण्याचा प्रयत्न काही प्रमाणात झालेला दिसतो. विशेषत: 'अभिधानंतर'च्या पूर्वार्धातील पहिल्या काही अंकातला मजकूर अभ्यासल्यावर हे वैविध्य लक्षात येते. जागतिकीकरणाच्या संदर्भात साहित्य प्रकाशित करण्याविषयीही आपले मत नोंदवताना 'अभिधानंतर'चे संपादक म्हणतात, "मराठी भाषेचं ग्लोबलायझेशननंतरचे स्थान, एकूण जागतिक साहित्यातील मराठीचे स्थान, तसेच भाषिक, साहित्यिक व सांस्कृतिक बदलांचा विचार 'अभिधानंतर' करणार आहे."[३] पुढच्या काळात याच भूमिकेला धरून नाटक, कविता, कथा, परिसंवाद, लेखमालिका, दृश्यकला, जाहिरात कला, अनुवादित मजकूर अशा विविधांगी प्रकारचे साहित्य 'अभिधानंतर'मधून वेळोवेळी प्रकाशित झालेले दिसते. याच वाङ्मयीन वैविध्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न पुढील मुद्द्यांच्या आधारे केलेला आहे.

**नाट्यविषयक लेखन :**

'अभिधानंतर' या अनियतकालिकाचा पहिला अंक १९९९ यावर्षी जुलै ते सप्टेंबर असा प्रकाशित झाला. या पहिल्या अंकातच जयंत पवार यांची 'माझे समकालीन नाटककार' ही मालिका सुरू झालेली दिसते. पहिल्या अंकात जयंत पवार यांनी मांडलेली भूमिका 'प्रस्तावना' म्हणून आलेली असून त्यांनी आपल्या 'प्रस्तावने'त मराठीतील तत्कालीन तीन प्रमुख नाटककारांच्या नाट्यलेखनाचा उल्लेख केलेला दिसतो. ज्यामध्ये प्रामुख्याने प्रेमानंद गज्वी, अजित दळवी आणि शफाअत

खान या पुढच्या काळात सिद्धहस्त नाटककार म्हणून प्रस्थापित झालेल्या मराठीतील तीन प्रमुख नाटककारांच्या नाटकांविषयी लेखन केलेले आहे. या प्रस्तावानेत जयंत पवारांनी आपल्या समकालीन लिहिणाऱ्या दहा नाटककरांच्या नाट्यलेखनाचा उल्लेख केलेला आहे. परंतु त्यातील पुढच्या काही अंकातच ही मालिका खंडित झालेली दिसते.

'अभिधानंतर'च्या दुसऱ्या ८० पृष्ठांच्या अंकात 'समकालीन नाटककार' या मालिकेतला पहिला लेख हा प्रेमानंद गज्वी यांच्या नाट्यलेखनाविषयी 'गज्वींचा खडक' या शीर्षकाखाली लिहिलेला दिसतो. तिसऱ्या व चौथ्या अंकांमध्ये एकांकिकांच्या संदर्भातला एक लेख संदेश ढगे यांनी लिहिलेला दिसतो. तर पाचव्या अंकात जयंत पवारांनी 'समकालीन नाटककार' या मालिकेतला शफाअत खान यांच्यावर लिहिलेला लेख बघायला मिळतो. त्यानंतर मात्र या अनियतकालिकाने गांभीर्याने म्हणावी अशी नाट्यविषयक चर्चा घडवून आणली नाही.

**कथनात्म साहित्यविषयक लेखन :**

'अभिधानंतर'च्या पहिल्या अंकातच कर्त्यांनी कथा व कविता लेखनाची स्पर्धा घेण्याचे जाहीर केलेले दिसते. पुढच्या अंकापासून कथा व कविता स्पर्धाही घेतलेली दिसते. मात्र स्पर्धेविषयी फारसा समाधानकारक प्रतिसाद कर्त्यांना मिळाला नसल्यामुळे 'यापुढे 'अभिधानंतर' कथा व कविता स्पर्धेचे आयोजन करणार नाही, हे आता जाहीर करीत आहोत',[४] असे सूतोवाच त्यांना उद्वेगाने काढावे लागलेले दिसतात. आपण असे का करीत आहोत, याचीही कारणे कर्त्यांनी पुढच्या निवेदनात सांगितलेली दिसतात. "स्पर्धेला संख्यात्मकदृष्ट्या चांगला प्रतिसाद मिळाला पण किमान दर्जाची व पारितोषिक देता यावी अशी एकही कथा व कविता मिळू नये, हे आमचं व मराठीचं दुर्भाग्य... त्यामुळे नाईलाजाने उत्तेजनार्थ पारितोषिके देत आहोत."[५] असे निवेदन या स्पर्धेच्या आयोजनानंतर हाती लागलेल्या कथा व कविता यांच्या दर्जाला धरून केलेले दिसते. थोडक्यात, कर्त्यांचे हे उद्गार तत्कालीन मराठी कथेची व कवितेची स्थिती दर्शविणारे आहेत.

२००१ साली 'अभिधानंतर'चा एक दिवाळी अंक प्रकाशित झाला. या अंकात 'मराठी कथेचे रूप' हा वसंत आबाजी डहाके यांचा लेख प्रकाशित झालेला दिसतो. ज्यामध्ये त्यांनी तत्कालीन कथेच्या प्रकृतिविषयी साधकबाधक चर्चा केलेली दिसते. याशिवाय याच अंकात 'हेमंत दिवटे यांच्या कादंबरीतील एक खर्डा' या शीर्षकाचा मजकूरही छापून आलेला दिसतो.

**कविताविषयक लेखन :**

दहा वर्षांच्या वाङ्मयीन प्रवासात 'अभिधानंतर'ने नव्वदोत्तर मराठी कवितेची एक सक्षम पिढी घडविण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला दिसतो. १९९९ साली निघालेल्या पहिल्या अंकापासून सुरू केलेली काव्यलेखन स्पर्धा दुसऱ्या अंकात, प्रकाशित झालेली कवी किशोर कदम अर्थात सौमित्र यांची मुलाखत तसेच कविता विभागात दिलीप चित्रे यांच्या कवितेसोबत तत्कालीन नव्या पिढीतील वर्जेश सोलंकी, प्रज्ञा लोखंडे, नितीन कुलकर्णी, अरुण काळे, दासू वैद्य इत्यादींच्या कविता आहेत. तिसऱ्या अंकात नव्वदोत्तर कवितेचा पहिला प्रकाशकीय प्रयोग म्हणून ज्याकडे पाहिले गेले, त्या लोकवाङ्मय गृहाने प्रकाशित केलेल्या 'आजची कविता' मालिकेतील आठ कवींच्या कविता आलेल्या आहेत तर चौथ्या अंकात तत्कालीन पिढीतील हेमंत दिवटे, वर्जेश सोलंकी, गणेश वसईकर, अशोक कोतवाल इत्यादींच्या कविता आलेल्या आहेत. 'अभिधानंतर'चा २००० सालचा दिवाळी अंकही कवितेलाच अग्रक्रम देणारा

आहे. अकरा कवींच्या कविता, अरुण म्हात्रे यांची मुलाखत, 'अभिधा'तून प्रकाशित झालेल्या दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्या कवितेवरच्या लेखांचे पुनर्मुद्रण असा काव्यविषयक भरपूर मजकूर असलेला हा अंक निश्चितच महत्त्वाचा आहे. 'अभिधानंतर'च्या सुरुवातीच्या अंकांमधून मिलान कुंदेरा, गॅब्रियल गार्सीओ, माक्झेव, निदा फाजली, सोयर रसूल पॉपूर, राजेश जोशी, वास्को पोपा, निके फोरास, ब्रेटा क्रॉस, चंद्रकांत देवताले, गगन गिल, मंगलेश डबराल, अशोक वाजपेयी, विस्लावा शिम्बॉस्का, सविता सिंग, तेंझिन सुंडू, दोस्तोव्हस्की, अल्ताफ टायरवाला इत्यादी देश-विदेशातील कवींच्या दर्जेदार कवितांचे सुंदर व रसपूर्ण अनुवादही प्रकाशित झालेले दिसतात. 'अभिधानंतर'चा दिवाळी २००१ चा अंक एक वैशिष्ट्यपूर्ण अंक आहे. दिलीप चित्रे, भालचंद्र नेमाडे, रंगनाथ पठारे, आणि नीतीन रेंढे यांनी केलेली आजच्या कवितेची चर्चा या अंकात आलेली आहे.

'अभिधानंतर'चे पुढच्या वर्षात तीन अंक निघाले. त्यातील एप्रिल ते सप्टेंबर २००२ च्या अंकात कर्त्यांनी 'माझा समकालीन कवी' आणि 'माझ्या पिढीवर प्रभाव ठसवणारे कवी' हे दोन परिसंवाद प्रकाशित केलेले दिसतात. यात 'समकालीन कवीं'मध्ये श्रीधर तिळवे, अरुण काळे, महेंद्र भवरे, अभिजीत देशपांडे यांनी विवेक मोहन राजापुरे, भुजंग मेश्राम, अरुण काळे व श्रीधर तिळवे यांच्याविषयी लिहिलेले आहे. तर माझ्या 'पिढीवर प्रभाव टाकणारे कवी' या परिसंवादात भुजंग मेश्राम, श्रीधर तिळवे, अशोक कोतवाल व मोहन बोरसे यांनी आपल्यावर झालेल्या, न झालेल्या प्रभावाविषयी लिहिलेले आहे. याचा अर्थ १९९० ते २००० या कालखंडात काव्यलेखन करणाऱ्या कवींवर कोण्या एका विशिष्ट प्रवृत्तीचा, पिढीचा अथवा कवींचा प्रभाव नव्हता. तर वेगवेगळ्या प्रवृत्तींचे, कवींचे प्रभाव स्वीकारून ही कविता उभी राहत होती. एकूणच 'अभिधानंतर'च्या कर्त्यांनी काही कवींना बोलते करून त्यांच्यावरच्या प्रभावाची चर्चा एका मर्यादित स्वरूपातच झालेली असली तरी तत्कालीन कवितेची व कवींची जडणघडण कशी झाली, हे तपासून पाहण्यासाठी उपयोगाची आहे.

२००३ मध्ये 'अभिधानंतर'चे दोन अंक निघाले. यावर्षीच्या पहिल्या अंकात पहिल्यांदाच नव्वदोत्तर कवितेची एकत्रित समीक्षा करणारा लेख प्रकाशित झालेला दिसतो. याच अंकातील एकनाथ पगार यांचा 'गेल्या दशकातील कविता : काही नोंदी' हा लेखही अभ्यासपूर्ण व चिकित्सक दृष्टीने लिहिलेला आहे. तसेच याच अंकात 'आजची कविता' या शीर्षकाखाली आठ कवी इतर समकालीन कवींच्या कवितांचा आढावा घेतलेला दिसतो. या समीक्षात्मक लेखातून मांडलेले निष्कर्ष हे प्राथमिक स्वरूपाचे असल्यामुळे ते पुढच्या काळात पूर्णपणे खरे ठरू शकले नाहीत. परंतु त्यातील काही निष्कर्ष भविष्यातील काव्याच्या वाटचालीकडे निर्देश करणारे ठरले. यावर्षीच्या दुसऱ्या अंकात 'नव्वदोत्तर कविता' या विषयावर आधारलेले सहा लेख प्रकाशित झाले आहेत. 'अभिधानंतर'च्या दशकातील कविता या आपल्या संपादकीय लेखामध्ये हेमंत दिवटे यांनी कवितेचे स्वरूप, दिशा व भवितव्य या अनुषंगाने आपले विचार मांडले आहेत. आपले निरीक्षण नोंदवताना या संपादकीय लेखात ते म्हणतात, "संभ्रमात पडलेली ही पिढी महत्त्वाची अशासाठी की अनेक पातळयांच्यात केऑसच्या सिच्युएशनमध्येही कविता लिहायची कसरती करते आहे. व्यक्त होतानाचे ताणतणाव पेलते आहे. असं जगणं कधीच नव्हतं म्हणून अशा जगण्याच्या चक्रात अडकलेल्या पिढीची कविता म्हणून तिच्याकडे पाहायला हवं."[६] असाच विचार इतर काव्य समीक्षकांनीही केलेला दिसतो. २००३ च्या दुसऱ्या अंकात नितीन कुलकर्णी, मन्या जोशी, सचिन केतकर,

प्रवीण बांदेकर, वर्जेश सोलंकी यांच्यासह चंद्रकांत देवताले या हिंदी कवीची मुलाखतही प्रकाशित झाली आहे.

पुढच्या वर्षी म्हणजे २००४ साली निघालेल्या दोन अंकांपैकी पहिला अंक हा जानेवारी ते जून २००४ असा असून तो 'अरुण कोलटकर विशेषांक' आहे तर दिवाळी २००४ च्या दुसऱ्या अंकातून पुन्हा एकदा नव्वदोत्तर कवींच्या कविता, हिंदी व इतर परकीय भाषेतील कविता असा मजकूर समोर येतो.

२००५ सालच्या दोन अंकांपैकी पहिला जानेवारी ते जून २००५ चा अंक 'लाईव्ह अपडेट विशेषांक' आहे. 'अभिधानंतर' प्रकाशनाने 'लाईव्ह अपडेट' ही अँथॉलॉजी याच सुमारास प्रकाशित केली. यात मराठीतील ३० कवींच्या कवितांचा समावेश होता. या अंकात नव्वदोत्तर कवितेतील तीन महत्त्वाचे कवी अर्थात सलील वाघ, मंगेश नारायणराव काळे व सचिन केतकर यांच्या मुलाखती आलेल्या असून त्याबाबत कर्ते म्हणतात, "या अंकात असलेल्या तीन कवींच्या मुलाखती या पिढीतले तेच महत्त्वाचे कवी आहेत म्हणून घेतलेल्या नाहीत तर वेगवेगळ्या पर्यावरणातले कवी त्यांच्या परीने विचार करत आहेत व त्यांच्याकडे ठाम अशी काही एक भूमिका आहे."[७] एकूणच या अंकाचे स्वरूप एका पिढीची प्रस्थापना करून त्यांना अधोरेखित करणे, एवढेच असल्याचे दिसून येते. याच वर्षीच्या दिवाळी २००५ या अंकामध्ये वर्जेश सोलंकी व संजीव खांडेकर या कवींच्या मुलाखती आहेत. शिवाय जागतिकीकरण या विषयावरील परिसंवादात अविनाश सप्रे यांच्या 'जागतिकीकरण आणि संस्कृती विचार', डॉ. जयंत गाडगीळ यांच्या 'संहितेपासून अतिसंहितेपर्यंत तत्वज्ञान, साहित्य, जागतिकीकरणाबद्दल काही नोंदी', भालचंद्र दिवाडकर यांच्या 'नव्या संस्कृतीच्या शोधात' आणि दीपक घारे यांच्या 'अपारंपरिक दृश्यकला' यांसारख्या महत्त्वपूर्ण व गंभीर चर्चा घडवून आणणाऱ्या लेखांचाही समावेश आहे.

२००६ यावर्षी प्रकाशित झालेल्या तीन अंकांपैकी पहिल्या अंकात यापुढे हे अनियतकालिक त्रैमासिक स्वरूपात निघणार नसल्याची घोषणा करताना जागतिकीकरणाबाबत व नव्वदोत्तरी कवितेबाबत कर्ते आपली भूमिका स्पष्ट करताना म्हणतात, "सुमारे सात वर्षे 'अभिधानंतर' त्रैमासिक होते. पहिल्या अंकापासून जागतिकीकरण, त्याचे स्वरूप, परिणाम, मराठी कवितेत ते कसे येते वगैरे गोष्टींचा विचार आला तर मासिकाचा शेवटचा अंक 'जागतिकीकरण आणि संस्कृती विचार' या अंकाबरोबरच सात वर्षे चालवलेल्या या चर्चेचा शेवट झाला... त्रैमासिक स्वरूपात 'अभिधानंतर' प्रसिद्ध करताना गेली सात वर्षे नेटाने लावून धरलेला जागतिकीकरण वगैरे वरील फोकस आता उत्तर जागतिकीकरणाकडे, विस्ताराकडे वळवण्याचा उद्देश आहे."[८] यानंतरचा आपला पुढचा मोर्चा त्यांनी जागतिकीकरणाच्या नंतरच्या परिवर्तनाकडे वळविलेला दिसतो. याच वर्षी या अनियतकालिकाला महाराष्ट्र फाउंडेशनचा पुरस्कारही मिळालेला दिसतो.

यानंतरच्या पुढच्या सात अंकांमधून 'अभिधानंतर'च्या कर्त्यांनी आजच्या कवितेतील नवता, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, केंद्र नाकारणारी नवी कविता, समकालीनांचे प्रश्न, चांगल्या कवितेचे निकष, अनुवादित कविता, कवितेवरील परिसंवाद, वाङ्मयीन नियतकालिके व काळाची आव्हाने अशा विविधांगी विषयांवर सखोल व चिंतनशील चर्चा घडवून आणलेली दिसते.

**समारोप व निष्कर्ष :**

'अभिधानंतर' या अनियतकालिकाची वाङ्मयीन भूमिका दहा वर्षांच्या कालखंडात कालानुरूप बदलत, नव्याचा स्वीकार करीत, अगदी परिपक्व झालेली दिसते. जागतिकीकरण व त्याच्या परिणामांची चर्चा ठळकपणे घडवून आणणारे पहिले अनियतकालिक म्हणून

'अभिधानंतर'चे नाव घ्यावेच लागते. जागतिकीकरण व मराठी साहित्य यांचा परस्पर संबंध शोधण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न महत्त्वाचा आहे. त्या अनुषंगाने प्रस्तुत शोधनिबंधातून काही निष्कर्ष आपल्या हाती लागतात. ते पुढील प्रमाणे -

१. नव्वदोत्तर कालखंडात साठोत्तरी कवितेतील महत्त्वाच्या कवींना अधोरेखित करण्याचा प्रयत्न 'अभिधानंतर'ने प्रामुख्याने केला.

२. तत्कालीन व्यवस्थेविरुद्ध उभे राहून स्वतःची प्रकाशन संस्था काढून आपला वाङ्मयीन व्यवहार स्वायत्त करण्याच्या उद्देशाने 'अभिधानंतर' याच नावाने प्रकाशन संस्था काढून या अनियतकालिकांच्या कर्त्यांनी आपल्या पिढीतील समकालीन कवींचे संग्रह प्रकाशित केलेले दिसतात.

३. हेमंत दिवटे, मंगेश नारायणराव काळे, सचिन केतकर, संजीव खांडेकर, वर्जेश सोलंकी, देविदास चौधरी, मोहन बोरसे, प्रदीप पाटील, संतोष पवार, मीनाक्षी पाटील, मनोज पाठक यांसारख्या जागतिकीकरणावर लिहिणाऱ्या नवदोत्तर कवींच्या पिढीच्या काव्यलेखनास व्यासपीठ देऊन मराठी वाङ्याच्या इतिहासात एक नवी पिढी उभारण्याचे काम 'अभिधानंतर'ने केले.

४. आपल्या पिढीची कविता सातत्याने दीड दशक प्रकाशित करायची व तिच्या स्थितीगतीची चर्चा साहित्याच्या केंद्रस्थानी ठेवायची, ही 'अभिधानंतर'च्या कर्त्यांची भूमिका वाङ्मयीन इतिहासात नक्कीच महत्त्वाची आहे.

**संदर्भ :**


१. दिवटे, हेमंत, (संपा.), संपादकीय, अभिधानंतर, अंक पहिला, शेगाव, जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर १९९९, पृष्ठ क्र. २
२. तत्रैव, पृष्ठ क्र. ३
३. तत्रैव, पृष्ठ क्र. ३
४. दिवटे, हेमंत, (संपा.), संपादकीय, अभिधानंतर, अंक दुसरा, शेगाव, दिवाळी १९९९, पृष्ठ क्र. ५
५. तत्रैव, पृष्ठ क्र. ६
६. दिवटे, हेमंत, (संपा.), संपादकीय, अभिधानंतर, अंक तेरावा, शेगाव, जुलै-डिसेंबर २००३, पृष्ठ क्र. ५
७. दिवटे, हेमंत, (संपा.), संपादकीय, अभिधानंतर, अंक सोळावा, शेगाव, जानेवारी-जून २००५, पृष्ठ क्र. ६
८. दिवटे, हेमंत, (संपा.), संपादकीय, अभिधानंतर, अंक अठरावा, शेगाव, जानेवारी-फेब्रुवारी २००६, पृष्ठ क्र. ७